**L. A. BILL No. XXVI OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६.

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ६ ऑक्टोबर २०२१ रोजी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२१ प्रख्यापित केला होता ; २०१७ चा महा. ६. २०२१ चा महा. अध्या ८.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.
(२) तो, दिनांक ६ ऑक्टोबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १०९ मधील,— २०१७ चा महा. ६.

(१) पोट-कलम (३) मध्ये, खंड (घ) मधील तिसऱ्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी अर्ज करण्याचा, अधिष्ठाता मंडळाकडून अर्जाची छाननी करणे व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह राज्य शासनाकडे पाठविण्याचा आणि राज्य शासनाकडून इरादा पत्र देण्याचा दिनांक २०२१ -२०२२ या शैक्षणिक वर्षासाठी, वाढविण्याच्या दृष्टीने, खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) च्या खंड (क), (ग) व (घ) मध्ये विनिर्दिष्ट केलेला दिवस किंवा दिनांक हे, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येतीलः—

| खंड | विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेला दिवस किंवा दिनांक | २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी तरतूद केलेला दिवस किंवा दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (क) | ज्यावर्षी इरादा पत्र मागवले असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी. | ३१ ऑक्टोबर २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी. |
| (ग) | ज्यावर्षी असा अर्ज विद्यापीठाला प्राप्त झाला असेल त्या वर्षाच्या ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी. | ३१ डिसेंबर २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी. |
| (घ) | लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी. | २८ फेब्रुवारी २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी."; |

(२) पोट-कलम (४) मध्ये, खंड (क) मधील विद्यमान परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईलः—

"परंतु, २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून, नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाइट केंद्र सुरू करण्याकरिता परवानगी मागणाऱ्या व्यवस्थापनास, ३१ ऑक्टोबर २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी कुलसचिवाकडे अर्ज करता येईल.".

२०२१ चा महा. अध्या. ८.

सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ याचे निरसन व व्यावृती.

**३.** (१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२१ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी १८७१—२ (५००-१२-२०२१)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६.]**

**[महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यांत आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. उदय सामंत,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई